MHAH220009082019

फौजदारी चौ.अर्ज. क्र.२४५/२०१९
रोहिणी वैभव निंबाळकर व दुसरा विरुध्द
वैभव काकासाहेब निंबाळकर व इतर

## निशाणी क्र.०२ वरील आदेश

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये दाखल केला असून प्रस्तुत अर्ज कलम २३ प्रमाणे देऊन मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदारांना अंतरिम पोटगी प्रत्येकी दरमहा ५,०००/– रुपये देण्याबाबत विनंती केली आहे.

२) अर्जदाराने गाव नमूना ८अ, गट क्र.४९०, ४२३, ४८०, ४८६ चे ७/१२ उतारे, तर सामनेवाला क्र.२ व ४ यांचे खाते उतारे दाखल केले आहेत. सामनेवाला क्र.१ विरुध्द भा.द.वि. कलम ३७६(ड) प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाचा प्रथम खबरी अहवाल निशाणी क्र.१५ सोबत दाखल केला.

३) सामनेवालांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

४) अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री.बी.पी. क्षिरसागर व सामनेवालांतर्फे विधीज्ञ श्री.एम.यु. नेवसे यांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रस्तुत अर्जाचे कामी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावर कारणासह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार कौटुंबिक हिंसाचाराने पीडित असल्याचे सिध्द करतात काय? | होय. |
| २. | अर्जदार विनंती प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय? | होय. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मान्य बाबी –**

६) अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ ची पत्नी असून अर्जदार क्र.२ त्यांची मुलगी आहे. सामनेवाला क्र.२ ते ६ हे सामनेवाला क्र.१ चे नातेवाईक आहेत. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक १८.०५.२०११ रोजी नागलवाडी येथे झाला आहे इत्यादी बाबी मान्य आहेत.

**युक्तिवाद –**

७) अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री.बी.पी. क्षिरसागर यांनी सामनेवाला यास भयंकर दारुचे व्यसन असून सामनेवालांनी अर्जदार व तिच्या नातेवाईकांची फसवणूक केली आहे. सामनेवाला सरकारी नोकरीत आहे असे सांगून लग्न लावून दिले. अर्जदाराच्या वडिलांनी ७० हजार रुपये हुंडा व ४ लाख रुपये खर्चून लग्न लावून दिले आहे. तथापि, सामनेवाला शेती व मजुरीचे काम करतो. अर्जदार फसवणूक होऊन देखील त्याच्या सोबत नांदत होती. तथापि, सामनेवाला क्र.१ ते ४ हे तिला शारीरिक व मानसिक त्रास देत होते. सामनेवाला लग्नाच्या तिसऱ्या दिवशी पासूनच दारु पिवून अर्जदारास शिवीगाळ व मारहाण करु लागला. अर्जदारास रामेश्वर येथे फिरायला घेऊन गेला, तथापि तेथे दारु पिवून तिला दरीत ढकलून देण्याचा प्रयत्न केला. अर्जदार क्र.१ अर्जदार क्र.२ चे प्रसुति वेळी व त्यानंतरही मुलगी झाल्याने सामनेवाला भेटण्यास अगर विचारपूस करण्यासही गेला नाही. मुलगी चार महिन्यांची झाल्यानंतर अर्जदार नांदण्यास आली तेव्हा मुलगी झाल्याच्या कारणावरुन तिला मारहाण केली. लहान मुलीस भिंतीवर

फेकून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सामनेवाला तिच्याशी अश्लिल वर्तन करुन बळजबरीने शारीरिक संबंध ठेवत होता. तिचा लैंगिक छळ करत होता. तिला ब-याच वेळा मारण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर सामनेवालाने एका महिलेवर बलात्कार केला असून तो तीन महिने कैदेत होता. त्यावेळी अर्जदार क्र.२ आजारी पडली. तथापि, सामनेवाला क्र.२ व ३ यांनी तिची विचारपूस केली नाही, लक्ष दिले नाही. त्यामुळे अर्जदाराने भावास फोन केला. नाविलाजास्तव अर्जदार क्र.२ च्या उपचारासाठी माहेरी गेली. त्यानंतर दुस-या दिवशी सामनेवाला क्र.२ व ६ यांनी माहेरी येऊन अर्जदाराच्या नातेवाईकांना शिवीगाळ केली. सामनेवाला आल्यानंतर अर्जदार पुन्हा नांदण्यास गेली तेव्हाही तिला शारीरिक व मानसिक त्रास दिला असून तिचे दागिने हिसकावून घेतले आहेत. तसेच पुन्हा दागिन्यांची मागणी करुन मारहाण केली. अर्जदारांना पुणे येथे घेऊन गेला. परंतु तेथे ही मारहाण केली. तेथून अर्जदार भावाला फोन करुन कशीबशी घरी आली. सामनेवालाची नांदविण्याची इच्छा नसून अर्जदार हे हिंसाचाराने पीडित आहेत, त्यांना उत्पन्नाचे साधन नाही. याउलट सामनेवाला यास शेती असून ऊस, कांदा, गहू अशी पीके घेतली जातात. त्यातून दरसाल ३ ते ४ लाख रुपये उत्पन्न मिळते. तर सामनेवालांच्या मालकीचा ट्रॅक्टर असून त्यांना दरमहा ३० ते ३५ हजार रुपये मिळतात. सामनेवाला क्र.१ इतर कामे करुन दरमहा १० ते १५ हजार रुपये मिळवितो. त्यामुळे त्याची अर्जदारांना विनंती प्रमाणे पोटगी देण्याची ऐपत आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

८) सामनेवालांतर्फे विधीज्ञ श्री.एम.यु. नेवसे यांनी अर्जदार लग्नानंतर काही दिवसातच ''मला दरिद्री घरात आवडत नाही, माझी हौस मौज होत नाही, खेडेगावात करमत नाही'', असे म्हणून आदळ-आपट करीत. कामधंदा न करता दिवस-दिवस

झोपून राहत असे. विनाकारण सामनेवाला क्र.१ ते ३ यांना त्रास देत असे. वास्तविक लग्नाचा संपूर्ण खर्च सामनेवालाच्या वडिलांनी केला असून अर्जदाराच्या वडिलांनाही ८० हजार रुपये दिले. लग्नानंतर वडील आजारी असल्याने सामनेवाला क्र.१ ने अर्जदारास बरीच रक्कम दिली. तथापि, त्यानंतरही अर्जदार भावाच्या सांगण्यावरून रकमेची मागणी करुन सामनेवालाशी भांडणतंटा करू लागली व माहेरी निघून जावू लागली. गरोदर असतांना आईवडीलांपासून विभक्त राहिले तरच नांदेल, असे म्हणून भांडण करुन निघून गेली. सामनेवालाने प्रसुतिनंतर समजावून विभक्त राहू असे सांगून नांदण्यास आणले. पुणे येथे घेऊन गेला व काम करुन उपजिवीका करु लागला. तथापि, तेथे ही अर्जदार भावाला फोन करुन सामनेवालास त्रास देत होती. दुसऱ्यांदा गरोदर असतांना तिने संसार करायचा नाही, मला सोडचिठ्ठी दया असे म्हणून भांडणतंटा करुन भावा बरोबर माहेरी गेली व गर्भपात करुन टाकला. सामनेवाला नातेवाईकांना घेऊन नांदण्यास आणण्यासाठी गेला असता. सामनेवाला क्र.१ यास जबर मारहाण करून गंभीर दुखापत केली. सामनेवालाने नांदविण्याचा प्रयत्न केला परंतु, अर्जदाराने त्यास प्रतिसाद दिला नाही. उलट जमीन नावावर करुन दे, ती विक्री करुन घरच्यांना बंगला बांधून देणार आहे असे म्हणून नांदण्यास येण्यास नकार दिला. सामनेवालास मारहाण केल्याने हात मोडला असून त्यास कामधंदा होत नाही. त्यामुळे सामनेवालाची अंतरिम पोटगी देण्याची ऐपत नाही. याउलट अर्जदार मजुरी करत असून तिला दररोज ३००/– रुपये मिळतात. त्यामुळे अर्जदार त्यांची उपजिवीका भागवू शकतात. सबब अर्ज नामंजूर करावा.

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> –**

९) अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे सामनेवालांनी नांदत असतांना तिला

शारीरिक व मानसिक त्रास दिला. सामनेवाला क्र.१ ने दारु पिवून तिला मारहाण केली. रामेश्वर येथे फिरण्यास घेऊन गेला असता तेथे दरीत ढकलण्याचा प्रयत्न केला. तसेच ती प्रसुतिनंतर माहेरी असतांना भेटण्यास गेला नाही. मुलीची विचारपूस केली नाही. मुलगी झाली तथापि, मुलगाहवा होता म्हणून नांदण्यास आल्यावर मारहाण केली. तसेच अर्जदार क्र.२ हिस भिंतीवर फेकून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. अर्जदार क्र.१ सोबत बळजबरीने शारीरिक संबंध ठेवून तिला शारीरिक व मानसिक त्रास देऊन तिचा लैंगिक छळ केला. सामनेवाला क्र.१ विरुध्द भा.द.वि.कलम ३७६(ड) प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून तो जेल मध्ये असतांना सामनेवाला क्र.२ व ३ यांनी अर्जदार क्र.२ आजारी असतांनाही तिची विचारपूस केली नाही. आवश्यक उपचार दिले नाही. त्यामुळे अर्जदाराने भावाला बोलावून माहेरी गेली असता सामनेवाला क्र.२ व ६ यांनी माहेरी जाऊन तिला व तिच्या नातेवाईकांना शिवीगाळ केली आहे. सामनेवाला क्र.१ जेल मधून परत आल्यानंतर पुन्हा अर्जदार नांदण्यास गेली असता तिला शारीरिक व मानसिक त्रास दिला आहे. पुणे येथे नेऊनही तिला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे कथन केले आहे. अर्जदाराने अर्जा पृष्टयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल केले असून तिच्या कथनावर अविश्वास दर्शवावा असा कोणताही पुरावा पटलावर नाही.

१०) सामनेवालाविरुध्द गु.र.क्र.६५/२०13 ने भा.द.वि.कलम ३७६(ड) प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून सामनेवाला तीन महिने जेल मध्ये होता. सामनेवालाने सदर मजकूर नाकारला आहे. तथापि, त्याच्या विरुध्द गुन्हा दाखलच नाही अगर खोटा गुन्हा दाखल केल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. याउलट अर्जदारच भांडणतंटा करत होती. झोपून राहत होती असे आरोप करुन अर्जदाराने बेकायदेशीररित्या गर्भपात केला. तिच्या नातेवाईकांनी सामनेवाला क्र.१ यास मारहाण केली. त्यास गंभीर

दुखापती झाल्याचे कथन केले आहे. तथापि, सामनेवालाने सदर कथना पृष्टयर्थ स्वतःचे शपथपत्र दिले नाही. त्यामुळे सामनेवालाचे कथन विश्वासार्ह वाटत नाही.

११) अर्जदाराने नमूद केलेले शारीरिक व मानसिक त्रासाचे कथन पाहता सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी अर्जदार सासरी नांदत असतांना तिला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे दिसून येते. अर्जदार क्र.१ व २ हे अर्जदार क्र.१ च्या माहेरी राहत असल्याचे सामनेवाला यांनी मान्य केले आहे. अर्जदार माहेरी राहत असल्यापासून त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काही रक्कम दिली अगर उदरनिर्वाहाची सोय केली याबाबत कोणतेही कथन सामनेवाला यांनी केले नाही. तसा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. यावरुन अर्जदार माहेरी गेल्यापासून सामनेवालाने अर्जदारांचा उदरनिर्वाह, कपडालत्ता व औषधोपचार याची कोणतीही सोय केली नाही हे सिध्द होते. यासर्व कारणांचा विचार करता अर्जदार कौटुंबिक हिंसाचाराने पीडित असल्याचे सिध्द होते. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.२ व ३ करिता</u> –

१२) अर्जदार क्र.२ चे वय ६ वर्ष असून ती शिक्षण घेते. सामनेवालांनीच मान्य केल्याप्रमाणे अर्जदाराचा गर्भपात झाला आहे. तसेच अर्जदार क्र.२ अज्ञान असून तिच्या पालनपोषणाची जबाबदारी अर्जदारावर आहे. त्यामुळे तिला कोणतेही कष्टाचे काम करणे शक्य नाही. अर्जदारास स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे असा कोणताही पुरावा सामनेवालांनी सादर केला नाही. अर्जदाराने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही असे कथन केले आहे. वर नमूद कारणांचा विचार करता अर्जदाराचे कथन विश्वासार्ह वाटते.

१३) सामनेवालाने तो मारहाण झाल्याने गंभीर जखमी होऊन कोणतेही काम करु शकत नाही असे कथन केले आहे. तथापि, त्या पृष्टयर्थ कोणताही पुरावा सादर

केला नाही. सामनेवाला पुणे येथे मजुरी करुन उपजिविका करत होता. म्हणजेच तो कुशल मजूर आहे. तसेच सामनेवाला क्र.२ व ४ यांच्या नावे एकूण १ हेक्टर ६७ आर जमीन आहे. त्यात ज्वारी, कापूस असे उत्पन्न घेतले आहे. त्यावरुन सामनेवालास शेतीचे उत्पन्नाही मिळते. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ इतर कामे करतो. त्यातून त्यास दरमहा १० ते १५ हजार रुपये मिळतात असे कथन केले आहे. सामनेवालाने सदर बाब नाकारली आहे. तथापि, त्याचा व्यवसाय शेती असल्याचे नाकारले नाही. सामनेवाला कुशल कामगार असल्याचे त्याच्या कथनावरुनच दिसून येते. त्यामुळे सामनेवालास दरमहा किमान ६ हजार रुपये उत्पन्न मिळणे सहज शक्य आहे. सामनेवाला क्र.१ च्या उत्पन्नावर अन्य कोणी अवलंबून आहे असे कोणतेही कथन नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ चे उत्पन्न सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांच्यात विभागण्यास उपलब्ध आहे.

१४) अर्जदार जानेवारी २०१३ नंतर तिच्या माहेरी नागलवाडी येथे राहते. त्यांना उत्पन्नाचे पुरेसे साधन नाही. त्यामुळे त्यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा प्रत्येकी १,५००/- रुपये अंतरिम पोटगी देणे न्याय वाटते. सबब मुद्दा क्र.२ चे उत्तर वरील प्रमाणे देऊन मुद्दा क्र.३ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र.२ अंशतः मंजूर केला.

२. सामनेवाला क्र.१ यास असे आदेशीत करण्यात येते की, मूळ अर्जाचा गुणदोषावर न्यायनिर्णय होईपर्यंत अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा प्रत्येकी १,५००/- रुपये अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून दयावी.

३. आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

४. खर्च अंतिम आदेशावर अवलंबून राहिल.

Dhanaji Jayasing Patil
Digitally signed by Dhanaji Jayasing Patil
Date: 2021.02.16 15:30:46 +0530

( डि.जे. पाटील )

दिनांक – १६.०२.२०२१ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

ठिकाण – कर्जत कर्जत